महाराष्ट्र शासन

वनविभाग

# मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर यांचे कार्यालय

चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी,चंद्रपूर परिसर, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१

दुरध्वनी क्रमांक:०७१७२-२५६२७९/२७७२३२ ७५८८७४८८९५ ई-मेल:-ccftchandrapur@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-७ (२)/आस्था /प्र.क्र.०७/ २६-२७/ 28 चंद्रपूर-४४२४०१ दिनांक 27/०५/२०२६

आदेश/ ई-मेलव्दारे

**विषय :** **नियतकालीक बदल्या सन -२०२६**
**वनरक्षक संवर्गाच्या बदल्या व पदस्थापना.**

**संदर्भ:**
१) शासन, महसूल व वनविभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक एमएफएस -२०१६/ प्र.क्र. १४३/फ-८ दिनांक २२ मे, २०१७
२) शासन, महसूल व वनविभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक एमएफएस-२०१८/प्र.क्र.३५/फ-८ दिनांक ०४ एप्रिल,२०१८
३) शासन,सामान्य प्रशासन विभाग,निर्णय क्रं.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन -१२, दिनांक ९ एप्रिल, २०१८
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्या १२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२

*****

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार चंद्रपूर वनवृत्तातील वनरक्षक (गट-क) संवर्गातील कर्मचाऱ्यांचे नियतकालिक बदलीसंदर्भात सक्षम प्राधिकारी यांना शिफारस करणेस्तव नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक २६.०५.२०२६ रोजी पार पडली.

उक्त बैठकीत नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशी व बदली अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक :एफएसटी-१२/१७/ प्र.क्र.६६४/ फ-४, दिनांक ११.०१.२०१८ अन्वये प्राप्त शक्तीचा वापर करुन वनरक्षक ( गट-क ) संवर्गातील कर्मचाऱ्याची प्रशासकीय कारणास्तव बदली व पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | वनरक्षकाचे नाव ( सर्वश्री ) | सध्या कार्यरत ठिकाण | बदली व पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | पत्रु विलास कावळे | विशेष व्याघ्र संरक्षण दल, चंद्रपूर | नियतक्षेत्र-हरणपायली परिक्षेत्र-कोठारी वनविभाग-मध्य चांदा | श्रीमती मिराबाई नाथराव राठोड, वनरक्षक यांचे बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर |

२. सदरहू आदेश तात्काळ अमलात येत असून उपरोक्त वनरक्षक यांना कार्यरत पदावरुन तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

३. संबधित कर्मचारी हे महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम,१९८१ च्या नियम १५ अन्वये उक्त तरतुदीनुसार पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणूक ) नियम,१९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम, १९८२ मधील नियमानुसार दिलेल्या पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांने बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा **अकार्यदिन (dies non )** म्हणून गणला जाईल.

५. सध्याचे कार्यालय प्रमुखांनी, संबधित कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये, ज्या कर्मचाऱ्यांना रजा मंजूर करण्यात आलेली आहे, त्यांना तात्काळ रजा समाप्तीनंतर बदलीचे ठिकाणी हजर होण्याचे सुचवावे. त्यांना कोणत्याही कारणास्तव रजा वाढ देण्यात येवु नये, महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा ) नियम, १९८१ मधील नियम ३० (c) नुसार संबधित कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबधित कर्मचाऱ्यांना मुळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. बदली झालेल्या कर्मचाऱ्याने कार्यमुक्त केल्यानंतर, अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नविन पदस्थापनेवर रुजु व्हावे, जे कर्मचारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा कर्मचारी यांची अनाधिकृत अनुपस्थिती म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड होईल याची जाणीव सर्व संबधिताना करुन देण्यात यावी.

७. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणूक) नियम , १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

Office of the Chief Conservator of Forests (T) Chandrapur

Ramanuj

( आर.एम.रामानुजम )
मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर

प्रति,

१) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प,चंद्रपूर
२) उपसंचालक ( कोअर ) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प,चंद्रपूर
३) उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर
४) सहाय्यक वनसंरक्षक,विशेष व्याघ्र संरक्षण दल,चंद्रपूर
५) संबधित वनरक्षक ( मार्फत- संबधित नियंत्रक अधिकारी )

प्रतिलिपी :- प्रधान मुख्य वनसरक्षक ( प्रशासन-दुय्यम संवर्ग ) महा.राज्य,नागपूर यांना माहितीस सविनय सादर.